(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं/३-अ/पदो-बिसं /पोउपनि (वाह.) ते पोनि (वाह.) /४७/२०२२ — दिनांक १८ /०१/२०२४

**वाचा :-** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१.
३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. ०२ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रता तपासून निवडसूची तयार केली आहे. निवडसूचीमध्ये पात्र ९ अधिका-यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक- १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल संवर्ग वाटप करण्यात आलेले आहेत.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद ९ पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून " **पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक)**" पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | इरफान इब्राहिम तडवी | नंदुरबार | नाशिक | जळगांव |
| २. | दत्तात्रय जगन्नाथ लोहार | मुंबई शहर | नाशिक | नाशिक परिक्षेत्र |
| ३. | अशोक तानबाजी चवरे | नागपूर ग्रामीण | नागपूर | नागपूर परिक्षेत्र |
| ४. | दामोधर पुंजाराम कोकाटे | एसडीआरएफ, नागपूर | नागपूर | रा.रा.पो.बल, गट क्र. ४, नागपूर |
| ५. | प्रविण सहदेवराव नांदुरकर | गडचिरोली | अमरावती | अमरावती परिक्षेत्र |
| ६. | अरविंद अहिबरण पाल | बि.सं.पुर्व विभाग, नागपूर | कोकण-२ | पोलीस आयुक्त, ठाणे शहर |
| ७. | अनिल बालाजी मुंडे | छत्रपती संभाजी नगर | कोकण-२ | पोलीस आयुक्त, नवी मुंबई |
| ८. | संजय शंकरराव चिंतेवार | नांदेड | पुणे | संचालक कार्यालय, पुणे |
| ९. | रमेश शहाजीराव घोरपडे | जालना | छत्रपती संभाजी नगर | रा.रा.पो.बल, गट क्र. ३, जालना |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर पदोन्नती आदेशामधील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) हे जर आदेशांमध्ये नमूद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकांत कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकांत हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**६. पदोन्नती झालेल्या सर्व पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, मुंबई शहर (सस्नेह )
पोलीस आयुक्त, ठाणे शहर / नवी मुंबई / छत्रपती संभाजी नगर
अपर पोलीस महासंचालक व संचालक दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व परीक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परीक्षेत्र, कॅम्प नागपूर
पोलीस अधीक्षक, नंदूरबार / नागपूर ग्रामीण / गडचिरोली / नांदेड / जालना / जळगांव
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे / बिनतारी संदेश, पूर्व विभाग, नागपूर / बिनतारी संदेश, मध्य विभाग, औरंगाबाद
समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. ३, जालना / गट क्र. ४, नागपूर
समादेशक तथा नियंत्रण अधिकारी, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर

प्रत सस्नेह सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल - १, मुंबई / महालेखापाल - २, नागपूर

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतूक) यांना पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश (वाहतूक) ( PSI W/L (Traff.) to PI W/L (Traff.) Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. ०२/०९/११/११-अ/३६/४०.

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे करिता.

D/Traffic PEB Minutes22-23/Traffic letter-23